# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०१२/ ९२६००

दिनांक : 22 AUG 2012

प्रति,
प्राचार्य,
विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे,
कॉलेज ऑफ फार्मसी,
हशु अडवाणी मेमोरीअल कॉम्लेक्स,
कलेक्टर कॉलनीच्या मागे,
वडवली गाव, चेंबूर (पू.)
जि.मुंबई उपनगर - ४०० ०७४.

**( Institute Code 3237 )**

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :** १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/१-६८८५३२५५१/२०१२/ईओए दि. १० मे, २०१२.
२. शासन निर्णय, क्रमांक - टिईएम -२०१२/प्र.क्र.९८(भाग-१)/तांशि-४ दि. ३० जून, २०१२.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना-अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामध्ये नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून खालीलप्रमाणे परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| ०१. | एम.फार्म. क्वालिटी ॲशुरन्स | १८ |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटीचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१, दि. २१ मे, १९८३ अनवये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटीव शर्ती आपणास बंधनकारक असतील.
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहिल.
४. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून कस्टमर आयडी क्र. ५२५७३७३५४ दि. २६.०७.२०१२ अन्वये रु. ३.०० लाख आयसीआयसीआय बँक, शाखा – चेंबूर, मुंबई येथे संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

D:\sandhya\Final order variation 12-13\Pharmacy 12-13.doc

VES COLLEGE OF PHARMACY
29/8/12
2788
CHEMBUR, MUMBAI-400 074.

30/8/12

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई शिक्षण शुल्क समिती, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क शिक्षणशुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे. निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त फी आकारु नये. विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास व याबाबत विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकाकडून तक्रार प्राप्त झाल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास होणा-या सर्व परिणामास संस्था जबाबदार राहील.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इत्यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व **कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई** यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

९. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन किंवा **कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई** यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेत आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा **कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई** यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला **कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई** यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी प्रवेश नियमात विहीत केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेश पक्रियेद्वारे करण्यांत येतील.

१३. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही, तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१४. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

१५. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमांक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबींसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

१६. शासनाने, या संचालनालयाने **कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई** व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

(डॉ सुभाष महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत -

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. **कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई** यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
6. निवड नस्ती.

D:\sandhya\Final order variation 12-13\Pharmacy 12-13.doc